**अतित्वर्य/महत्वाचे**
<u>आजचे आज वाटणे</u>

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**( खास सभा )**
**<u>कार्यपत्रिका क्रमांक ४२</u>**

स्थायी समितीची खास सभा **शनिवार दि. ७/१/२०१७** रोजी सकाळी १०:०० ( दहा ) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

## <u>मा.सभासदांचे प्रस्ताव</u>

**विषय क्र.** २४००

**मा. फारूक इनामदार व मा.सुनील गोगले यांचे दि. ६/१/२०१७ चे पत्र.**

**प्रभाग क्र.१ अ, मधील २४ मी.रस्ता रुंदीकरणात विश्रांतवाडी –धानोरी लोहगाव हददीतील बाधित मिळकतदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये २८,६७,४२,०६७/- रुपये सदरची रक्कम तातडीने उपलब्ध करून द्यावी.**

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. २४०१**

मा.सौ.सुष्मा निम्हण व मा.सौ.शितल सावंत, मा.श्रीमती स्मिता वस्ते, मा.सौ.अनिता डाखवे, मा.विनायक हनमघर, मा.सौ.अस्मिता शिंदे यांचे दि.६/१/२०१७ चे पत्र.

श्री.सुभाष पुरी, क्रिडा अधिकारी यांनी आजपर्यंत आपल्या सेवेत प्रामाणिक व कार्यक्षमतेने काम करीत असून गेली १३ वर्षापासून ते पुणे मनपाच्या क्रिडा विभागाचे काम अत्यंत एकनिष्ठेतेने करीत असून त्यांच्या केलेल्या कामाची दखल घेऊन उपायुक्त क्रिडा हे पद नव्याने निर्माण करुन त्यावर त्यांची नेमणूक करण्यात यावी.

### सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. २४०२**

मनपा मुख्य भवन येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे वायरिंग व तदनुषंगिक विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३८,२६,८७५/– पेक्षा ३२.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,६४,००६=६३ पर्यंत काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/१२६८ दि. ४/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४०३**

वडगाव जलकेंद्र अखत्यारीतील केदारेश्वर पंपिंग व आगम मंदिर पंपिंग चालविणे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.डेक्कन एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८१,५७,०६८=८० पेक्षा २२.६% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,००,००,५६६=३५ (दि.१/१/२०१७ ते ३१/१२/२०१७) पर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१२६९ दि. ४/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४०४**

प्रभाग क्र. ३० ब येथे उद्यान विभागामार्फत विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.इरिटेक इंजिनिअर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९५,१७,५९८=०९ पेक्षा १३.३७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७८,६४,३९१=३० पर्यंत (१५% कपातीनुसार उपलब्ध रकमेपर्यंत) काम करून घेणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२७३ दि. ५/१/२०१७ चे पत्र.

विषय क्र. २४०५

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालय येथे 2 D Eco Colour Doppler Machine खरेदी करणे ( टेंडर क्रमांक १०९ सन १६-१७ ) कामी नविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदाधारकांनी त्यांच्या निविदा सादर केल्या असून निविदेत प्राप्त झालेले दरांचे अवलोकन केले असता चित्रा सेल्स ॲन्ड सर्व्हिस यांनी इतर दोन निविदाधारकांपेक्षा सर्वात कमी दर दिलेला असल्याने त्यांचेकडून प्रति नग रक्कम रूपये७३,९५,९२३/- ( अक्षरी रक्कम रूपये त्र्याहत्तर लाख पंच्यानव हजार नउशे तेवीस फक्त ) पर्यंत खरेदी करण्यास व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२७६ दि. ५/१/२०१७ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१६-१७ CE17A 254/SJ-8-20 प्रभाग क्रमांक ५६ अ मध्ये जनता व मनपाच्या दवाखान्यामध्ये वैदयकीय उपकरणे खरेदी करणे व तदअनुषंगीक कामे करणे.मान्य तरतूद रक्कम रूपये १,००,००,०००/- पैकी रक्कम रूपये ८५,००,०००/-

विषय क्र. २४०६

पुणे महानगरपालिकेच्या कै.यशवंत थरकुडे दवाखाना येथे कॉम्प्युटेड रेडिओग्राफी सिस्टिम विथ टेलिरेडिओग्राफी सिस्टिम ॲन्ड मोबाईल एक्स-रे युनिट टर्न कि पध्दतीने खरेदी करणे ( टेंडर क्रमांक १०८ सन १६-१७ ) कामी नविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदाधारकांनी त्यांच्या निविदा सादर केल्या असून निविदेत प्राप्त झालेले दरांचे अवलोकन केले असता चित्रा सेल्स ॲन्ड सर्व्हिस यांनी इतर दोन निविदाधारकांपेक्षा सर्वात कमी दर दिलेला असल्याने त्यांचेकडून कॉम्प्युटेड रेडिओग्राफी सिस्टिम विथ टेलिरेडिओग्राफी सिस्टिम ॲन्ड मोबाईल एक्स-रे युनिट टर्न कि पध्दतीने प्रति नग रक्कम रूपये ९३,९५,७२३/- (अक्षरी रक्कम रूपये त्र्यानव लाख पंच्यानव हजार सातशे तेवीस फक्त ) पर्यंत खरेदी करण्यास व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२७७ दि. ५/१/२०१७ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१६-१७
CE17A 254/SJ-8-21
प्रभाग क्रमांक ३६ अ मध्ये एरंडवणा दवाखाना येथे विविध
वैदयकीय उपकरणे खरेदी करणे व तदअनुषंगीक कामे करणे.
मान्य तरतूद रक्कम रूपये १,७५,००,०००/- पैकी १,४८,७५,०००/-

विषय क्र. २४०७

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमाक १ ब मधील झोंपडपटटीमधील व वस्त्यांमधील नागरीकांची साथीचे सांसर्गिक व असांसर्गिक आजारासंदर्भात जनजागृती व आरोग्य तपासणी करणे ( टेंडर क्रमांक १०७ सन २०१६-१७ ) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदाधारकांनी त्यांच्या निविदा सादर केल्या असून निविदेत प्राप्त झालेले दरांचे अवलोकन केले असता अतिथी हेल्थकेअर सर्व्हिसेस प्रा.लि.या संस्थेने दिलेला दर रक्कम रूपये १११०/- प्रति रुग्ण असून तो दर सर्वात कमी असल्याने त्यांच्याकडून हे काम प्रति रूग्ण रक्कम रूपये १११०/- याप्रमाणे रक्कम रूपये ४२,५०,००० /- ( अक्षरी रक्कम रूपये बेचाळीस लाख पन्नास हजार फक्त ) पर्यंत काम करून घेण्यास व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२७८ दि. ५/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४०८**

कार्यकारी अभियंता (पथ) क्र. ६ यांचे कार्यक्षेत्रातील हडपसर, नगररोड, वडगाव शेरी, येरवडा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत व परिसरामध्ये विविध कंपन्या व संस्थांमार्फत करण्यात आलेल्या खोदकामाचे रिईनस्टेटमेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,४९,९९,६२३/- पेक्षा २८.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,४८,८४,७३१=९५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२७९ दि. ५/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४०९**

प्रभाग क्र. ४ अ मधील प्रतिकनगर ते टिंगरेनगर रोड, आदर्श नगर व जाधवनगर येथील रस्ते यु.टी.डब्ल्यू.टी. पध्दतीने रस्ते कॉंक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राधालक्ष्मी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,९९,४२०/- पेक्षा २२.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,८३,५४९=९२ पैकी उपलब्ध तरतूदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२८० दि. ५/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४१०**

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ४५ महंमदवाडी येथे २५ मे.टन मिश्र कचरा विलगीकरण करणे व विलगीकरण केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प स्थापत्य कामासह यांत्रिकी व विद्युत कामासह उभारणे कार्यान्वित करणे व पुढील ५ वर्षे देखभाल व दुरुस्ती करणे (बी-२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यु ग्लोबल इको सोल्युशन यांचेकडून अ) प्रकल्प उभारणीचा खर्च र.रुपये ८०,५२,०००/- ब) यांत्रिकी खर्च र.रुपये५६,४०,०००/- सर्व करांसहीत असे एकूण मिळून र.रुपये १,३६,९२,०००/- (एक कोटी छत्तीस लाख ब्याण्णव हजार) (तडजोडीने) रक्कमेपर्यंत व क) पहिल्या वर्षासाठी देखभाल र.रुपये ३८९/- प्रती व पुढील दरवर्षी १०% वाढ (एकुण पाच वर्षासाठी) सर्व करासहीत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घकव्य/१२८३ दि. ६/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४११**

पुणे महानगरपालिकेच्या रोकेम अजिंक्य व दिशा प्रकल्पातून निर्माण होणारा रिजेक्ट मटेरियलची वाहतूक हायवा मार्फत (क्षमता - १५ घ.मी.) देवाची उरुळी/फुरुसुंगी येथील कचरा डेपो पर्यंत करणे (बी-२ पध्दतीचे निविदा) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बालाजी अर्थमुव्हर्स ॲण्ड लॅण्ड डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १) रोकेम अजिंक्य व दिशा प्रकल्पातून निर्माण होणारा रिजेक्ट मटेरियलची वाहतूक हायवा मार्फत (क्षमता - १५ घ.मी.) देवाची उरुळी/फुरुसुंगी येथील कचरा डेपो पर्यंत करणे र.रुपये ९५,४०,०००/- २) जेसीबी पुरविणे र.रुपये १,००,०००/- असे एकूण र.रुपये ९६,४०,०००/- (अक्षरी र.रुपये श्याहण्णव लक्ष चाळीस हजार फक्त) सर्व करांसहीत याप्रमाणे काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घकव्य/१२८४ दि. ६/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४१२**

प्रभाग क्र. ३० ब मध्ये लॉन टेनिस ग्राऊंड बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दत्ता निवृत्ती मगर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९७,२०,१४५/- पेक्षा ३.८७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९३,४३,९७५=३८ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२८७ दि. ६/१/२०१७ चे पत्र.

### एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्र. २४१३**

प्रभाग क्र. ३० ब येथे उद्यान विभागामार्फत विविध कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.तिरुपती कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ३८,६३,१४४=५० पेक्षा १२.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,७९,८६५=१२ पर्यंत (१५% कपातीनुसार उपलब्ध रकमेपर्यंत) काम करून घेणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२७२ दि.५/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४१४**

प्रभाग क्र. ५७ ब पेशवे ऊर्जा उद्यान येथे शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील विविध प्रसंग उभारणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.मनिष शिंदे यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ३२,३४,९०५/- पेक्षा १७.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,७८,५०१=३७ पर्यंत (१५% कपातीनुसार उपलब्ध रकमेपर्यंत) काम करून घेणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२७४ दि.५/१/२०१७ चे पत्र.

### संकिर्ण

**विषय क्र. २४१५**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये खास देणगीबाबत संस्थांची नावे समाविष्ट करण्यासाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/उआ/साप्र/१२७१ दि.५/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४१६**

आरोग्य कार्यालयाअंतर्गत नव्याने स्मार्ट सेवा संस्थाकडून नेमणूक झालेल्या संगणक ऑपरेटर व त्यांचे वाढलेल्या रक्कमेचे मानधन याकरीता खालीलप्रमाणे र.रुपये ५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१२८२ दि.६/१/२०१७ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, ७क रुग्णालये प्र.गृह औषधालये इ., RE17F154, पुणे शहरातील झोपडपट्टी राहणारे/पिवळे रेशनकार्ड धारक/वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापर्यंतच्या नागरिकांसाठी पुणे मनपातर्फे आरोग्य सहाय्य योजना | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, RE17F102, क.इलाजात्मक (क्युरेटीव्ह) ५ लोक आरोग्य मुख्य देखरेख व इतर २.संकिर्ण | --- | ५० लाख |

**विषय क्र. २४१७**

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालयाच्या धर्तीवर सोनावणे प्रसुतिगृह येथील नवीन इमारत व राजीव गांधी रूग्णालयाकडील साफसफाईचे काम निविदा क्रमांक ५३ सन २०१५-१६ प्रमाणे रक्कम रूपये ९.९७५ प्रति स्वे.फूट याप्रमाणे या निविदेतील मान्य ठेकेदार **मे.दिशा एजन्सी** यांचेकडून रक्कम रूपये ५० लाखापर्यंत यांत्रिकी पध्दतीने जंतुनाशकासह साफसफाईचे काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा व त्यांचे बिल अदा करणेसाठी खालीलप्रमाणे र.रुपये५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१२८५ दि.६/१/२०१७ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, ७. रुग्णालये प्रसुतीगृह औषधालये इ., RE17F154, ६. पुणे शहरातील झोपडपट्टी राहणारे/पिवळे रेशनकार्ड धारक/वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापर्यंतच्या नागरिकांसाठी पुणे मनपातर्फे आरोग्य सहाय्य योजना | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका,कमला नेहरु रुग्णालय व इतर रुग्णालय येथे यांत्रिक पध्दतीने साफसफाई करणे, विविध सेवकवर्ग ठेकेदार पध्दतीने नेमणे, RE17F140**B**, | --- | ५० लाख |

**विषय क्र. २४१८**

पुणे मनपाच्या गणेश पेठ मांसळी मार्केटमध्ये होलसेल मांसळी विक्रीचे गाळे इच्छुक व्यवसायधारकांना गाळेवाटप करण्याच्या दृष्टीने खाली नमुद केलेल्या धोरणास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२८६ दि.६/१/२०१७ चे पत्र.

१) गणेशपेठ मांसळी मार्केटच्यावर होलसेल मांसळी विक्रीचे गाळे (३०० ते ५०० स्वे.फुट) क्षेत्रफळाचे गाळे निर्माण करण्याबाबत.
२) गणेशपेठ मांसळी मार्केटमध्ये इच्छुक व्यवसायधारकांकडून र.रू. ३०००/- प्रति.स्वे.फुट याप्रमाणे अनामत रक्कम स्वीकारण्यास.
३) अनामत रक्कमे व्यतिरिक्त प्रतिमहा जास्त गाळाभाडे देणाऱ्या इच्छुक व्यवसायधारकांना गाळयाचे वाटप करण्याबाबत.
४) होलसेल मांसळी विक्रीचे गाळे उभारण्यासाठी व्यवसाय धारकांकडून अनामत रक्कम स्वीकारण्यात येणार असल्याने सदर गाळे ३० वर्षे कालावधीसाठी करार पध्दतीने भाडयाने देण्यास.
५) उपरोक्त अटी व शर्ती समाविष्ट करून निविदा प्रक्रिया करण्यास.

**विषय क्र. २४१९**

प्रभाग क्र. ६७ ब मध्ये विविध चौक सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कला कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८४,९९,५५३/- पेक्षा १८.७१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,०९,२८६=६३ पर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटीशर्तीप्रमाणे भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम कमी/अधिक करणेस तसेच इतर निविदा अटी शर्तीनुसार काम करुन घेऊन देयक अदा करणेस यास अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/१२८८ दि. ६/१/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. २४२०**

मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि.६/१/२०१७ चे पत्र.

स्थायी समिती ठ.क्र. २३७६ दि. ३/१/२०१७ (पुणे महानगरपालिकेच्या कै.शिवशंकर पोटे दवाखान्याकडील एम.आर.आय. सी.टी.स्कॅन, डिजिटल एक्स-रे, सोनोग्राफी या सर्व सुविधा पी.पी.पी. तत्वावर संयुक्त विद्यमाने चालविणेकरीता चॅरिटेबल ट्रस्ट/खाजगी वैद्यकीय संस्था/स्वयंसेवी संस्था यांना १० वर्षाचे मुदतीकरीता कराराने चालविणेसाठी देणेबाबत) चा फेरविचार करण्यात येवून मा.महा.आयुक्त यांचे मुळ विषयपत्र मान्य करण्यात यावे.
(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. २४२१**

मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि.६/१/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.६७ ब मध्ये क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत विविध ठिकाणी यु.टी.डब्ल्यु.टी. रस्ते करणे या चालु असलेल्या कामांच्या निविदांना कमी पडणारी रक्कम उपलब्ध करुन देणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक , इंद्रधनुष्य कलाविष्कार वर्ग RE13#141 | २० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>**<br>प्रभाग क्र.६७ ब मध्ये क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत विविध ठिकाणी यु.टी.डब्ल्यु.टी. रस्ते करणे या चालु असलेल्या कामांच्या निविदांना कमी पडणारी रक्कम उपलब्ध करुन देणे | --- | २० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**मा. अध्यक्ष, स्थायी समिती**
**यांचे आज्ञेवरून**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**